## -: प्रेसनोट दिनांक- २२/०६/२०२० :-

**प्रमोद गोपाळराव कुलकर्णी, वय ५८, उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर, वर्ग -१, सध्या रा. घर नं.६५१/२, नवीन वसाहत, चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर, मुळ रा. कणगला, ता. हुक्केरी, जि. बेळगांव, रा. कर्नाटक यांनी लाच स्विकारलेबाबत....**

---

यातील तक्रारदार हे बांधकाम विभाग, जिल्हा परिषद व पी डब्ल्यु डी, कोल्हापूर यांचेकडे रजिस्टर कॉन्ट्रॅक्टर असुन यापुर्वी त्यांनी जिल्हा परिषद विभागाची चंदगड भागातील कामे घेवुन पुर्ण केली आहेत. त्यामध्ये तांबुळवाडी गावातील कॉक्रीट रोड, माणगांव अंगणवाडी इमारत, दाटे अंगणवाडी, सडेगुडवळे शाळेच्या इमारतीची दुरूस्ती, कानुर गावातील शाळेच्या इमारतीची दुरूस्ती, कोवाड-जकेनहट्टी रस्ता, माणगांव दलित वस्तीतील गटर इत्यादी कामे सन २०१५ ते २०१८ या कालावधीत पुर्ण केलेली आहेत. तक्रारदार यांचे कॉन्ट्रॅक्टर लायसन्सची बीड कपॅसिटी वाढणेसाठी त्यांनी पुर्ण केलेल्या कामांचे वर्कडन सर्टीफिकेट हे उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, चंदगड यांचे कार्यालयातर्फे जिल्हा परिषद, कोल्हापूर कार्यालयास सादर करणे आवश्यक होते. त्यामुळे तक्रारदार यांनी वर्कडन सर्टीफिकेट मिळणेसाठी उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, चंदगड येथील उपअभियंता श्री. कुलकर्णी यांना दि. १९/०५/२०२० रोजी भेटुन विनंती केली होती. त्यावेळी त्यांनी माणगांव दलित वस्ती सुधारणा करणेच्या पुर्ण झालेल्या कामाचे बील रू. ४,५०,०००/-, मुरकूटवाडी अंगणवाडी इमारतीचे चालु असले कामाचे बील रू. ३,००,०००/-, आंबेवाडी अंगणवाडी इमारतीचे चालु असले कामाचे बील रू. ३,००,०००/- अशा कामांचे मिळुन १५,०००/- रू. व इस्कीमो कंपनीस त्यांनी स्वत: कडुन दिलेले २,०००/- रू. असे एकुण मिळुन १७,०००/- रू. त्यांना द्यावे लागतील असे सांगुन वर्कडन सर्टीफिकेट बायहॅण्ड तक्रारदार यांचेकडे जिल्हा परिषद कार्यालयात सादर करणेकरिता दिले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता बांधकाम विभागाचे कार्यालयात जावुन सर्टीफिकेट जमा केली होती. तेव्हा कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांना प्रोसिजरप्रमाणे उपविभाग कार्यालयामार्फत अर्ज पाठविणेस सांगितले होते. त्यामुळे तक्रारदार यांनी दि. १९/०६/२०२० रोजी उपअभियंता कुलकर्णी यांना भेटुन वर्कडन सर्टीफिकेटबाबत विचारणा केली असता त्यांनी रितसर अर्ज देण्यास सांगुन पुन्हा वरीलप्रमाणे १७,०००/- रू. लाचेची मागणी केलेने तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे उपअभियंता कुलकर्णी यांच्याविरूध्द तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक २२/०६/२०२० रोजी उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, चंदगड कार्यालय येथे ब्युरोचे कार्यप्रणालीप्रमाणे पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये उपअभियंता. कुलकर्णी यांनी तक्रारदार यांनी पुर्ण केलेल्या शासकीय कामांची वर्कडन सर्टीफिकेट देणेसाठी तक्रारदार यांचेकडुन सध्या पुर्ण झालेल्या एका व चालु असलेल्या दोन कामांचे असे मिळुन तीन कामांचे प्रत्येकी ३,०००/- रू. प्रमाणे एकुण ९,०००/- रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवुन येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार लागलीच उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, चंदगड कार्यालय येथे सापळा कारवाई आयोजित केली असता, आरोपी लोकसेवक उपअभियंता कुलकर्णी यांनी तक्रारदार यांनी यापुर्वी पुर्ण केलेल्या शासकीय कामांचे वर्कडन सर्टीफिकेट देणेसाठी मागणी केलेप्रमाणे ९,०००/- रू. स्विकारल्याने त्यांचेवर यशस्वी सापळा कारवाई करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी प्रमोद गोपाळराव कुलकर्णी, उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर, वर्ग -१ यांचेविरूध्द चंदगड पोलीस ठाणे येथे गुन्हा नोदं करणेची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोहेकॉ मनोज खोत, पोना विकास माने व नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई, चालक पोहेकॉ सुरज अपराध, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.